पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ८१८ दिनांक - २०/११/२०२३**

फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर

## अपहरण करून जबरी चोरी करणा-या अंकुश थोरात (टोळी प्रमुख) व त्याचा साथीदार याचेवर मकोका अंतर्गत कारवाई

फिर्यादी हे दिनांक २६/१०/२०२३ रोजी पवळे चौक कसबा पेठ पुणे जवळील मेट्रो स्टेशन येथील बांधकाम साईटवर काम करतात फिर्यादी त्यांचे मित्र अमोल राजेंद्र गुजर, जनार्दन यादव यांचे सह ते चहा पिण्यासाठी पवळे चौक येथे गेले असता चहा पिऊन पुन्हा साईटवर चालत जात असतांना दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना धक्का दिला त्यानंतर त्या दोन अनोळखी इसमापैकी एकाने मला "तु धक्का का दिला त्यामुळे माझी चप्पल तुटली असे म्हणून ते दोघे फिर्यादी बरोबर भांडण करू लागले. त्यावेळी फिर्यादी व त्यांच्या मित्रांनी त्या दोन इसमांना खुप समजवण्याचा प्रयत्न केला तसेच त्यांची आम्ही माफी मागीतली तरी देखील ते दोघे हे माझ्या बरोबर भांडण करत होते. त्यावेळी फिर्यादी यांचे मित्रांना फोन आल्याने ते दोघेही फोनवर बोलत आमच्या पासून थोडे अंतर पुढे चालत गेले त्यावेळी अनोळखी इसमांनी एक रिक्षा थांबवली व जबरदस्तीने फिर्यादी यांना रिक्षा मध्ये बसवून डांबून ठेवले. त्यानंतर त्या इसमांनी रिक्षामध्ये त्यांचे जवळील चाकु दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी देऊन मोबाईल फोन व गुगल-पे किंवा फोनपे चा पासवर्ड विचारून फोन-पे ॲपद्वारे २०,३००/- रुपये ट्रान्सफर केल्याने. यांचे विरुध्द फिर्यादी यांनी फिर्याद दिल्याने **फरासखाना पोलीस ठाणे गुरनं.२१६/२०२३,भा.द.वि.कलम ३६४(अ),३९२,३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

दाखल गुन्हयाचे तपासा दरम्यान यातील निष्पन्न आरोपी नामे **१)अंकुश सुर्यकांत थोरात,वय-२९ वर्षे रा.गल्ली नं.२०,ताडीवाला रोड,पुणे,मुळ रा.गल्ली नं.६,मुकुंदवाडी,आंबिकानगर,औरंगाबाद (टोळी प्रमुख) २)मिथुन शिवदास कांबळे,वय-३० वर्षे,रा.१३,ताडीवाला रोड,पुणे (टोळी सदस्य)** यांना दाखल गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे.

गुन्ह्याचे तपासा मध्ये सदर आरोपी अंकुश सुर्यकांत थोरात (टोळी प्रमुख) याने प्रत्येक गुन्हयात वेग-वेगळे साथीदारांसह गुन्हे करुन,त्याव्दारे त्याचे टोळीच्या अवैद्य आर्थिक फायदयासाठी सदरचे गुन्हे केलेले आहे. सदर टोळीचे पुणे शहरात, पिंपरी व औरंगाबाद शहर हे गुन्हेगारी कार्यक्षेत्र असल्याने त्यांच्या गुन्हेगारी कारवायामुळे तेथे दहशत निर्माण झालेली आहे.

सदर टोळी प्रमुख व त्याचे साथीदार यांचेविरुध्द जबरी चोरी, अपहरण करुन खंडणी मागणे असे गुन्हे दाखल असून तो त्याचे टोळीची दहशत निर्माण करुन परिसरात त्याचे वर्चस्व निर्माण करीत आहे. तसेच स्वतःचे गुन्हेगारी टोळीचे अस्तित्व टिकविण्यासाठी सर्व सामान्य नागरीकांना टोळीतील सदस्याचे मदतीने अपहरण करुन खंडणी मागणे दहशत निर्माण करणे असे गुन्हे केलेले आहेत. त्यांचेवर वेळोवेळी प्रतिबंधक कारवाई करून देखील त्यांनी पुन्हा पुन्हा गंभीर स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

नमुद गुन्हयाच्या तपासा दरम्यान टोळी प्रमुख व त्याचे साथीदार याने संघटीतपणे दहशतीचे मार्गाने स्वतःचे फायदयासाठी प्रस्तुत गुन्हा केला असल्याचे दिसुन आलेने दाखल गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) अंतर्भाव करण्याचा प्रस्ताव फरासखाना पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. दादासाहेब चुडाप्पा यांनी पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-०१ श्री. संदिपसिंह गिल यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील यांना सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करून फरासखाना पोलीस ठाणे गुरनं.२१६/२०२३,भा.द.वि.कलम ३६४(अ),३९२,३४ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास फरासखाना विभागाचे सहा.पोलीस आयुक्त,श्री.अशोक धुमाळ हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-०१,पुणे,श्री.संदिपसिंह गिल, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, फरासखाना विभाग,पुणे,श्री.अशोक धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली फरासखाना पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.दादासाहेब चुडाप्पा, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.मंगेश जगताप, श्रीमती.अनिता हिवरकर, सहा. पोलीस निरीक्षक,वैभव गायकवाड,पोलीस उप-निरीक्षक,निलेश मोकाशी, निगराणी पथकातील पोलीस अंमलदार, तुषार खडके, अजित शिंदे, पंकज देशमुख व शशिकांत ननावरे यांनी केलेली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तालयाचा कार्यभार स्विकारल्यानंतर गुन्हेगारी नियंत्रणावर बारकाईने लक्ष देवून शरीराविरुध्द व मालमत्तेविरुध्द गुन्हे करणारे व समाजामध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून गुन्हेगारांचे समूळ उच्चाटन होईल यावर भर देण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना निर्देश दिले आहेत. **त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ८७ वी कारवाई आहे.**